आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१४ जुलै २०२६ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- भारत टेक्स २०२६चं नवी दिल्लीत भारत मंडपम इथं वस्त्रोद्योगमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- घाऊक चलन फुगवट्याच्या दरात जून महिन्यात १९ शतांश टक्के वाढ

- भारत- युके व्यापार करार उद्यापासून लागू होणार

- संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या अस्थायी सदस्यपदाच्या निवडणुकीसाठी भारताच्या मोहिमेला प्रारंभ

- पश्चिम आशियात इराण अमेरिका संघर्ष कायम

**आणि**

- जपान खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय खेळाडूंची विजयी सलामी

**<><><><><>**

नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित भारत टेक्स २०२६ या वस्त्रोद्योगाशी संबंधित देशातल्या सर्वात मोठ्या प्रदर्शनाचं केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांच्या हस्ते आज उदघाटन झालं. वस्त्रोद्योग राज्यमंत्री पवित्र मार्गेरिटा, वस्त्रोद्योग सचिव नीलम शमी राव आणि मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. ‘एफ फाईव्ह’, म्हणजेच फार्म, फायबर, फॅक्ट्री, फॅशन आणि फॉरेन या संकल्पनेवर आधारित हा कार्यक्रम असेल. चार दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमाचं आयोजन वस्त्रोद्योगाच्या मूल्य साखळीतले व्यवसाय, गुंतवणूक, स्रोत, नावीन्य, धोरणात्मक चर्चा आणि भागीदारीसाठी एक प्रमुख व्यासपीठ बनवण्याच्या उद्देशाने करण्यात येत आहे. हे प्रदर्शन खरेदीचे सर्व विक्रम मोडेल, असा विश्वास गिरीराज सिंह यांनी यावेळी व्यक्त केला…

**होल्ड… बाईट - गिरीराज सिंह**

**<><><><><>**

पश्चिम आशियातला संघर्ष आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीत झालेली जहाजांची नाकेबंदी यांमुळे घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलन फुगवट्याचा दर जून महिन्यात वाढून ९ पूर्णांक

८७ शतांश टक्क्यांवर पोहोचला आहे. उद्योग आणि वाणिज्य मंत्रालयाने ही माहिती दिली आहे. मे महिन्यात हा दर ९ पूर्णांक ६८ शतांश टक्के इतका होता. खनिज तेलं आणि संबंधित उत्पादनं, अन्नपदार्थ, मूलभूत धातूंचं उत्पादन आणि रसायनं आणि रासायनिक उत्पादन हे या वाढीमागचे मुख्य घटक ठरल्याचं मंत्रालयाने म्हटलं आहे. तर ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित चलन फुगवट्याचा दर मात्र जून महिन्यात ७ पूर्णांक ४८ टक्क्यांवर कायम राहिला आहे. रिझर्व्ह बँकेने चालू आर्थिक वर्षासाठी चलन फुगवट्याचा अंदाज ४ पूर्णांक ६ दशांश टक्क्यांवरून ५ पूर्णांक १ दशांश टक्क्यांपर्यंत वाढवला आहे. वाढलेला उत्पादन खर्च आणि जागतिक स्तरावर वाढलेल्या उर्जेच्या किमतीचा इंधन दरांवर झालेला परिणाम यांमुळे आरबीआयने ही वाढ केली आहे.

**<><><><><>**

भारत आणि युनायटेड किंगडम दरम्यानचा सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार उद्यापासून लागू होणार आहे. या महत्त्वाच्या करारामुळे भारतातून युके मध्ये होणाऱ्या ९९ टक्के निर्यातीवर कोणतंही शुल्क आकारलं जाणार नाही. परस्परांबरोबरची धोरणात्मक भागीदारी दृढ करून नागरिकांना समृद्धी मिळवून देण्याच्या दिशेने हे महत्वाचं पाऊल समजलं जात आहे. मे २०२१ मध्ये 'वर्धित व्यापार भागीदारी' आणि 'भारत-यूके रोडमॅप २०३०' ला मान्यता देऊन, दोन्ही देशांनी या कराराचा मार्ग मोकळा केला. या पथदर्शी आराखड्याच्या मदतीने २०३० पर्यंत परस्परांबरोबरच व्यापार दुप्पट करून तो १०० अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत नेण्याचं उद्दिष्ट निश्चित करण्यात आलं.

**<><><><><>**

'नीट' युजी फेर परीक्षेची ओएमआर शीट आणि उमेदवारांनी नोंदवलेल्या प्रतिक्रिया, एनटीए, अर्थात राष्ट्रीय परिक्षा संस्थेने प्रसिद्ध केल्या आहेत. उमेदवार त्यांच्या ॲप्लिकेशन नंबरचा वापर करून लॉग इन करू शकतील, आणि आपल्या मूळ उत्तरांची पडताळणी करू शकतील, अशी माहिती परीक्षा संस्थेच्या प्रसिद्धीपत्रकात दिली आहे.

**<><><><><>**

सीबीएसई, अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळानं आज आपली R3, म्हणजेच त्रिभाषा सूत्राबाबतची भूमिका जारी केली. त्यानुसार, सीबीएसई अंतर्गत येणाऱ्या तिसऱ्या भाषेचं मूल्यांकन केवळ शाळेतल्या अंतर्गत परीक्षांद्वारेच केलं जाईल. तसंच चालू शैक्षणिक

वर्षात सीबीएसई बोर्ड तिसऱ्या भाषेची परीक्षा घेणार नाही. ९ वी मध्ये जे विद्यार्थी R3 मध्ये उत्तीर्ण होणार नाहीत, त्यांना १० वी मध्ये प्रवेश दिला जाईल, मात्र त्यांनी १० वीच्या वर्षात ही परीक्षा उत्तीर्ण होणं आवश्यक आहे.

इयत्ता ८ वी मधीली तीन भाषांची निवड इयत्ता ९ वी मध्येही कायम राहील आणि त्यापैकी एका भाषेची निवड 'R3' म्हणून करावी लागेल, असं सीबीएसई नं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

चारा घोटाळ्याप्रकरणी राजद प्रमुख लालू प्रसाद यादव यांना जामीन मंजूर करण्याच्या झारखंड उच्च न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करायला आज सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. या प्रकरणी प्रलंबित याचिकांवरची सुनावणी जलदगतीने घेण्याचे आदेशही न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती पी. बी. वराळे यांच्या पीठाने झारखंड उच्च न्यायालयाला दिले.

<><><><><>

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या २०२८-२९ या कालावधीसाठी अस्थायी सदस्यपदाच्या निवडणुकीसाठी भारताने आपली मोहीम अधिकृतरित्या सुरू केली आहे. न्यूयॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात काल परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी भारताचा ‘शांती’ हा दृष्टिकोन मांडला. संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेपासून भारताने सुमारे ५० शांतता रक्षक मोहिमांसाठी सुमारे तीन लाख कर्मचारी दिले आहेत आणि सध्या १० मोहिमांमध्ये भारताचे ४ हजार ३०० पेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत आहेत, असं ते यावेळी म्हणाले. सुरक्षा परिषदेत भारताच्या सहभागामुळे या अत्यंत महत्त्वाच्या संस्थेतली निर्णयप्रक्रिया अधिक बळकट व्हायला मदत होईल, असा विश्वास जयशंकर यांनी यावेळी व्यक्त केला.

<><><><><>

संयुक्त राष्ट्रांचं सदस्यत्व पॅलेस्टाईनला मिळावं याकरता भारतानं पाठिंबा दिला आहे. बेल्जीयमची राजधानी ब्रसेल्स इथं काल झालेल्या पॅलेस्टाईन डोनर ग्रुपच्या मंत्रीस्तरीय बैठकीत परराष्ट्र मंत्रालयाच्या सचिव श्रीप्रिया रंगनाथन यांनी ही माहिती दिली.

<><><><><>

अमेरिकेने काल सलग तिसऱ्या रात्री इराणवर हल्ले सुरूच ठेवल्यामुळे दोन्ही देशांमधला संघर्ष आणखी तीव्र झाला आहे. या हल्ल्यांमुळे इराणच्या लष्कराचं सामर्थ्य कमी

होईल, आणि होर्मूझच्या सामुद्रधुनीमधून व्यापारी जहाजांना सुरक्षितपणे प्रवास करता येईल, असा अमेरिकेचा दावा आहे.

होर्मूझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या इराणच्या जहाजांवर, तसंच इराणबरोबर व्यापार करणाऱ्या देशांच्या जहाजांवर २० टक्के शुल्क आकारलं जाईल, मात्र, इतर देशांच्या व्यापारी जलवाहतुकीला मोकळा मार्ग मिळेल, असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल घोषित केलं होतं.

मात्र, इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीवर आपलं वर्चस्व कायम असल्याचं म्हटलं आहे, आणि अमेरिकेचा दावा फेटाळून लावला आहे. अमेरिकेला लॉजिस्टिक सहाय्य पुरवण्याचं कोणतंही कृत्य इराण विरोधात युद्ध छेडण्याचा प्रयत्न समजला जाईल, असा इशारा दिला आहे.

**<><><><>**

सीपीआय माओवादी या बंदी घातलेल्या संघटनेचा क्षेत्रीय कमांडर रविंद्र गंझू याला झारखंड पोलिसांनी लातेहार इथं अटक केलीय. गंझूवर झारखंड पोलिसांनी १५ लाखाचं तर राष्ट्रीय तपास यंत्रणेनं ५ लाखाचं बक्षीस लावलं होतं.

**<><><><>**

जपान खुल्या बॅडमिंटन स्पर्धेला आजपासून टोकियो इथं प्रांरभ झाला. भारताच्या पी. व्ही सिंधूने मलेशियाच्या वोंग लिंग चिंगला २१-१४, २१-११ असं हरवलं. मिश्र दुहेरीत तनिषा क्रॅस्टो आणि धृव कपिला यांच्या जोडीने स्कॉटलंडच्या अलेक्झांडर डन आणि ज्युली मॅकफर्सन या जोडीला २१-१६, २१-१४ असं पराभूत केलं. पुरुष एकेरीत आयुष शेट्टी आणि लक्ष्य सेन यांचे सामने उद्या होतील.

**<><><><>**

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय महिला क्रिकेट संघानं काल ऐतिहासिक कसोटी विजय नोंदवला. क्रिकेटची पंढरी मानली जाणाऱ्या लॉर्ड्स मैदानावर झालेल्या कसोटी सामन्यात भारतानं यजमान इंग्लंड संघाचा २७० धावांनी सहज पराभव केला.

दरम्यान, पुरुषांच्या क्रिकेटमध्ये भारत आणि इंग्लंड यांच्यातला मर्यादित षटकांचा पहिला सामना आज बर्मिंगहम मध्ये होणार आहे.

**<><><><>**

आकाशवाणी वृत्त सेवा विभागातले माजी संचालक सेबेस्टियन रॉबर्ट यांचं नुकतंच नवी दिल्लीत निधन झालं. गेली अनेक दशकं संरक्षण क्षेत्रातल्या आणि परदेशातल्या घडामोडींचं उत्कृष्ट वार्तांकन त्यांनी केलं होतं.

**//<><><><><>//**